**L. A. BILL No. XVII OF 2026.**

A BILL

TO REPEAL CERTAIN ENACTMENTS IN THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७.**

**महाराष्ट्र राज्यातील विवक्षित अधिनियमितींचे निरसन करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १७ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील विवक्षित अधिनियमितींचे निरसन करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र निरसन अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

**२.** यासोबत जोडलेल्या अनुसूची अ आणि अनुसूची ब यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमिती, याद्वारे, निरसित करण्यात येत आहेत. विवक्षित अधिनियमितींचे निरसन.

व्यावृत्ती. **३.** (१) या अधिनियमान्वये कोणतीही अधिनियमिती निरसित केल्यामुळे,—

(क) ज्या इतर कोणत्याही अधिनियमात तो लागू करण्यात आला असेल, तो समाविष्ट करण्यात आला असेल किंवा त्याचा उल्लेख करण्यात आला असेल त्यावर परिणाम होणार नाही ;

(ख) अगोदरच केलेली किंवा करू दिलेली कोणतीही गोष्ट किंवा अगोदरच संपादन केलेला कोणताही हक्क किंवा मालकीहक्क, प्राप्त झालेले कोणतेही आबंधन किंवा पत्करलेली जबाबदारी, किंवा त्यासंबंधातील कोणतीही उपाययोजना किंवा कामकाज, किंवा कोणतेही कर्ज, शास्ती, आबंधन, जबाबदारी, दावा किंवा मागणी यांत दिलेली सुट किंवा केलेली मुक्तता, किंवा अगोदरच दिलेली कोणतीही हमी किंवा पूर्वीच्या कोणत्याही कृतीचा किंवा गोष्टीचा पुरावा यांची वैधता, अवैधता, प्रभाव किंवा परिणाम यांस बाध येणार नाही ;

(ग) विधिचे कोणतेही तत्त्व किंवा नियम किंवा प्रस्थापित क्षेत्राधिकार, वाद, प्रतिवादाचे स्वरूप किंवा त्याचा क्रम, प्रथा किंवा कार्यपद्धती किंवा प्रचलित रिवाज, रूढी, विशेषाधिकार, निर्बंध, माफी, पद किंवा नेमणूक या गोष्टींस बाध येणार नाही. मग, त्या गोष्टी अनुक्रमे याद्वारे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये संमत केलेल्या असल्या किंवा त्यांस अशा अधिनियमात मान्यता मिळालेली असली किंवा त्या अशा अधिनियमातून निष्पन्न झालेल्या असल्या तरी हरकत नाही ;

(घ) निरसित केल्यामुळे, सध्या अस्तित्वात किंवा अंमलात नसलेला कोणताही क्षेत्राधिकार, पद, रूढी, जबाबदारी, हक्क, मालकीहक्क, विशेषाधिकार, निर्बंध, माफी, रिवाज, प्रथा, कार्यपद्धती किंवा इतर बाब किंवा गोष्ट पुन्हा अस्तित्वात किंवा अंमलात येणार नाही.

(२) या अधिनियमान्वये अनुसूची ब मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमिती निरसित केल्यामुळे, त्यांच्यासंबंधात कोणत्याही प्राधिकरणाकडून करण्यात आलेली किंवा करण्यात यावयाची लेखापरीक्षा, तपासणी, लेखांकन, अन्वेषण, चौकशी किंवा इतर कोणतीही कार्यवाही यांस, आणि जणू काही या अधिनियमाद्वारे उक्त अधिनियमिती निरसित केलेल्या नाहीत असे समजून अशी लेखापरीक्षा, तपासणी, लेखांकन, अन्वेषण, चौकशी किंवा इतर कोणतीही कार्यवाही केली जाऊ शकण्यास, किंवा त्या चालू ठेवण्यास बाध येणार नाही.

(३) महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियमाच्या कलम ७ च्या तरतुदी, या अधिनियमाद्वारे निरसित अधिनियमितीना लागू असतील. १९०४ चा १.

## अनुसूची अ

(कलम २ पहा)

### भाग-अ

विनियमन

| अनु. क्र. | वर्ष | क्रमांक | संक्षिप्त नाव |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | १८२५ | ११ | बंगाल जलोढ व गाळ विनियमन, १८२५. |
| २. | १८२७ | ५ | बंगाल जप्ती आणलेल्या मालमत्तांचे व्यवस्थापन विनियमन, १८२७. |
| ३. | १८२७ | ५ | ॠण, व्याज, गहाण अभिस्वीकृती विनियमन, १८२७. |

**भाग–ब**

मुंबई अधिनियम

| अनु. क्र. | वर्ष | क्रमांक | संक्षिप्त नाव |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | १८७७ | १४ | भडोच व खेडा यांतील भार असलेल्या भू-संपत्तीबाबत अधिनियम, १८७७. |
| २. | १८७८ | ५ | मुंबई अबकारी अधिनियम, १८७८. |
| ३. | १९२९ | १८ | बोर्स्टल शाळा अधिनियम, १९२९. |
| ४. | १९३५ | २९ | मुंबई फौजदारी प्रक्रिया (निवडणुकांशी संबंधित गुन्हे) सुधारणा अधिनियम, १९३५. |
| ५. | १९३६ | २० | महाराष्ट्र अफू ओढण्याबाबत अधिनियम. |
| ६. | १९३९ | २६ | मुंबई वैरण व धान्य नियंत्रण अधिनियम, १९३९. |
| ७. | १९४२ | ३० | मुंबई कापूस नियंत्रण अधिनियम, १९४२. |
| ८. | १९४६ | २० | महाराष्ट्र विद्युतशक्ती (विशेष अधिकार) अधिनियम. |
| ९. | १९४६ | २७ | मुंबई कापूस (आकडेवारी) अधिनियम, १९४६. |
| १०. | १९४७ | ३४ | मुंबई अभिनिर्णय प्रक्रिया (हस्तांतरण व चालू ठेवणे) अधिनियम, १९४७. |
| ११. | १९४७ | ५८ | मुंबईच्या शिधा वाटपाच्या (शिधा वाटपाची पूर्वतयारी करणे व ते चालू ठेवणे याबाबतच्या) उपायांबाबत अधिनियम, १९४७. |
| १२. | १९४८ | ५९ | मुंबई जनावरांच्या रोगांबाबत अधिनियम, १९४८. |
| १३. | १९४८ | ७१ | मुंबई बाल अधिनियम, १९४८. |
| १४. | १९४९ | ४४ | मुंबई शहर (इमारत बांधकाम निर्बंध) अधिनियम, १९४९. |
| १५. | १९५१ | २४ | मुंबई वन्य जनावरें आणि वन्य पक्षी संरक्षण अधिनियम, १९५१. |
| १६. | १९५३ | १७ | गांधी राष्ट्रीय स्मारक निधी (स्थानिक प्राधिकाऱ्यांच्या देणग्या) अधिनियम, १९५३. |
| १७. | १९५३ | २९ | मुंबई निर्वासित हितसंबंध (विभागणी) अधिनियमाच्या उपबंधांचें वैधकरण करणें व त्यांत अनुपूरक उपबंध दाखल करणें याबाबत अधिनियम, १९५३. |
| १८. | १९५७ | ३ | सन १९५६ चा मुंबईचा शहररचना योजना [मुंबई शहर, क्रमांक २, ३ व ४ (माहीम विभाग)] कायदेशीर ठरविण्याबाबत अधिनियम. |
| १९. | १९५७ | ५ | महाराष्ट्र भारित खर्च अधिनियम. |
| २०. | १९५७ | ३९ | मुंबईचा फटक्याची शिक्षा रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५७. |
| २१. | १९५८ | ६९ | मुंबई वजनें व मापें (अंमलात आणण्यासंबंधी) अधिनियम, १९५८. |
| २२. | १९५८ | ७८ | न्यायदानविषयक अधिकारी संरक्षण (मुंबई राज्याच्या हैद्राबाद आणि सौराष्ट्र प्रदेशांना लागू करण्याबाबत) अधिनियम, १९५८. |
| २३. | १९५९ | ३९ | महारोग्यांबाबत (मुंबई एकीकरण) अधिनियम, १९५९. |
| २४. | १९६० | २१ | मुंबई वैधानिक महामंडळे (प्रादेशिक पुनर्रचना) अधिनियम, १९६०. |

(शा.म.मु.) एचबी ३४१६-२ (४४५—३-२०२६)

## भाग-क

### मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम

| अनु. क्र. | वर्ष | क्रमांक | संक्षिप्त नाव |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | १९१५ | २ | मध्यप्रांत व वऱ्हाड उत्पादन शुल्क अधिनियम, १९१५. |
| २. | १९१९ | २ | मध्यप्रांत व वऱ्हाड भेसळ प्रतिबंधक अधिनियम, १९१९. |
| ३. | १९२९ | ८ | मध्यप्रांत व वऱ्हाड बाल धूम्रपान अधिनियम, १९२९. |
| ४. | १९३६ | ३४ | मध्यप्रांत व वऱ्हाड महामार्ग अधिनियम, १९३६. |
| ५. | १९४२ | ६ | मध्यप्रांत व वऱ्हाड हिंदू महिलांचे मालमत्तेचे हक्क (शेतजमिनीस लागू करणे) अधिनियम, १९४२. |
| ६. | १९४८ | १३ | मध्यप्रांत व वऱ्हाड क्षयरोग आरोग्यधाम (इमारतींचे विनियमन) अधिनियम, १९४८. |
| ७. | १९४८ | १७ | मध्यप्रांत जमिनींचे पुनःप्रापण (कंसचे निर्मूलन) अधिनियम, १९४८. |
| ८. | १९५० | २४ | मध्यप्रांत आणि वऱ्हाड राजभाषा अधिनियम, १९५०. |

## भाग-ड

### हैदराबाद अधिनियम

| अनु. क्र. | वर्ष | क्रमांक | संक्षिप्त नाव |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | १३१३ फसली | १ | प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम. |
| २. | १३२१ फसली | १ | रेल्वे, शासन सिंचन स्त्रोत आणि इतर सार्वजनिक इमारतींचे संरक्षण अधिनियम. |
| ३. | १३४३ फसली | ९ | हैदराबाद बाल संरक्षण अधिनियम. |
| ४. | १३४७ फसली | १ | हिंदू विधवा महिला अधिनियम. |
| ५. | १३५० फसली | १२ | हैदराबाद पाल्याधिकरण अधिनियम. |
| ६. | १३५१ फसली | ८ | नादारी अधिनियम. |
| ७. | १३५३ फसली | ९ | भागेलांचा करार अधिनियम, १३५३ फसली. |
| ८. | १३५८ फसली | ४३ | वेट्टी व बिगार (प्रतिबंध) विनियमन, १३५८ फसली. |
| ९. | १९५० | २९ | हैदराबाद (न्यायनिर्णयांच्या व आदेशांच्या भाषा) अधिनियम, १९५०. |
| १०. | १९५० | ३५ | हैदराबाद जिल्हा अधिकारी (पदनामातील बदल आणि संदर्भांचा अन्वयार्थ) अधिनियम, १९५०. |
| ११. | १९५२ | १२ | हैदराबाद जागिरदारांचे ऋण चुकते करणे अधिनियम, १९५२. |
| १२. | १९५२ | ३६ | हैदराबाद कामगार गृहनिर्माण अधिनियम, १९५२. |
| १३. | १९५२ | ४५ | हैदराबाद कृषि सुधार निधी अधिनियम, १९५२. |
| १४. | १९५३ | ७ | निर्वासित हितसंबंध (विभक्त करण्याबाबत) पुरवणी अधिनियम १९५३. |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १५. | १९५४ | २ | हैदराबाद कृषिविषयक आयकर (सूचनांची विधिग्राह्यता) अधिनियम, १९५४. |
| १६. | १९५६ | २ | हैदराबाद महानगरपालिका अधिनियम, १९५५. |
| १७. | १९५६ | १६ | हैदराबाद कृषिविषयक ऋणको साहाय्य अधिनियम, १९५६. |
| १८. | १९५६ | २० | हैदराबाद स्थानिक शासकीय सेवा (राज्य नागरी सेवा प्रतिज्ञापन) अधिनियम, १९५६. |

## भाग-ई

मध्य प्रदेश अधिनियम

| अनु. क्र. | वर्ष | क्रमांक | संक्षिप्त नाव |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | १९५० | ३७ | मध्य प्रदेश स्थानिक प्राधिकरण सेवा आयोग अधिनियम, १९५०. |
| २. | १९५३ | ५ | मध्य प्रदेश जमीन महसूल व भाड्याच्या थकबाकीची वसुली करण्याबाबत अधिनियम, १९५३. |
| ३. | १९५६ | १८ | मध्य प्रदेश सहकारी संस्था (पुनर्घटन व रचना) अधिनियम, १९५६. |

## अनुसूची ब

(कलम २ पहा)

विनियोग अधिनियम

| अनु. क्र. | वर्ष | क्रमांक | संक्षिप्त नाव |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | १९५० | ३ | मुंबई विनियोग अधिनियम, १९५०. |
| २. | १९५० | ५१ | मुंबई (पुरवणी) विनियोग अधिनियम, १९५०. |
| ३. | १९५१ | ४ | मुंबई विनियोग अधिनियम, १९५१. |
| ४. | १९५१ | ५ | मुंबई (पुरवणी) विनियोग अधिनियम, १९५१. |
| ५. | १९५१ | ३५ | मुंबई (द्वितीय पुरवणी) विनियोग अधिनियम, १९५१. |
| ६. | १९५२ | १ | मुंबई (प्रथम पुरवणी) विनियोग अधिनियम, १९५२. |
| ७. | १९५२ | ४ | मुंबई (गणनानुदान) विनियोग अधिनियम, १९५२. |
| ८. | १९५२ | १० | मुंबई विनियोग अधिनियम, १९५२. |
| ९. | १९५२ | १८ | मुंबई (द्वितीय पुरवणी) विनियोग अधिनियम, १९५२. |
| १०. | १९५३ | १ | मुंबई (पुरवणी) विनियोग अधिनियम, १९५३. |
| ११. | १९५३ | ६ | मुंबई विनियोग अधिनियम, १९५३. |
| १२. | १९५३ | ५१ | मुंबई (द्वितीय पुरवणी) विनियोग अधिनियम, १९५३. |
| १३. | १९५४ | १३ | मुंबई (पुरवणी) विनियोग अधिनियम, १९५४. |
| १४. | १९५४ | १७ | मुंबई विनियोग अधिनियम, १९५४. |
| १५. | १९५४ | ४९ | मुंबई (द्वितीय पुरवणी) विनियोग अधिनियम, १९५४. |
| १६. | १९५५ | ३ | मुंबई (पुरवणी) विनियोग अधिनियम, १९५५. |

एचबी ३४१६-२अ

| (१) | (२) | (३) | (४) | |
|---|---|---|---|---|
| १७. | १९५५ | ४ | मुंबई विनियोग अधिनियम, १९५५. | |
| १८. | १९५५ | ११ | मुंबई विनियोग (अधिक खर्च) अधिनियम, १९५५. | |
| १९. | १९५५ | ३३ | मुंबई (द्वितीय पुरवणी) विनियोग अधिनियम, १९५५. | |
| २०. | १९५५ | ४१ | मुंबई विनियोग (द्वितीय अधिक खर्च) अधिनियम, १९५५. | ५ |
| २१. | १९५६ | ४ | मुंबई (पुरवणी) विनियोग अधिनियम, १९५६. | |
| २२. | १९५६ | १४ | मुंबई विनियोग अधिनियम, १९५६. | |
| २३. | १९५६ | २५ | मुंबई विनियोग (अधिक खर्च) अधिनियम, १९५६. | |
| २४. | १९५६ | ४४ | मुंबई (द्वितीय पुरवणी) विनियोग अधिनियम, १९५६. | |

**उद्देश व कारणे यांचे निवेदन.**

सांविधानिक बदल, राज्याची पुनर्रचना, आणि नवीन कायद्यांची अधिनियमिती यांमुळे महाराष्ट्रातील अनेक अधिनियम कालबाह्य झाले आहेत. त्यांचे संदर्भ टिकून राहिल्यामुळे संदिग्धता निर्माण होत आहे. म्हणून, राज्य शासनाने, महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या सर्व राज्य कायद्यांचे परीक्षण करण्याचे काम हाती घेतले आहे आणि जे वापरात नाहीत असे मुंबई अधिनियम, मुंबई विनियम, बंगाल विनियम, मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम, हैदराबाद अधिनियम आणि मध्य प्रदेश अधिनियम निरसित करण्याचे ठरविले आहे.

विधेयकाच्या खंड ३ मध्ये, सावधगिरीची तरतूद म्हणून, या प्रकारच्या अधिनियमांमध्ये बहुतांश समाविष्ट असलेल्या, विवक्षित कार्यवाहीच्या व्यावृत्तीसाठीच्या तरतुदींचा अंतर्भाव आहे.

**२.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ११ मार्च, २०२६.

**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७.]**

**[महाराष्ट्र राज्यातील विवक्षित अधिनियमितींचे निरसन करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक १७ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई